REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 9 | JUNE - 2025

# " माध्यमिक स्तरावरील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास"

दत्तात्रय सुब्राव गुंजाळ
(प्राथमिक पदवीधर)
जिल्हा परिषद प्रशाला, भूम तालुका भूम, जिल्हा धाराशिव.

## संशोधनाची प्रस्तावना :-



ब्रिटिश राजवटीत इग्रजांनी शिक्षणास फारसे महत्त्व दिले नाही. राज्यकारभार चालविण्यासाठी आवश्यकतेवढे लोकसाक्षर करून राज्यव्यवस्था चालविली. भारतातील अनेकसमाजसुधारकांनी मात्र शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षण प्रसार करण्यासाठी अनेक प्रयत्न केलेले दिसून येतात. यामध्ये महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी विठ्ठल रामजीशिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, आगरकर इ. महाराष्ट्रातील शिक्षण तपस्वींचा उल्लेख करता येईल. असे असलेतरीसमाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणाचे महत्त्व पटण्यास खूप कालावधी लागला.

ब्रिटिश राजवटीत लॉर्ड मेकॉले यांनी भारतीयांना शिक्षण देण्यासाठी देशभर प्राथमिक शाळासुरू केल्या.मात्र सर्वाना शिक्षण न देता मुठभरांना शिक्षण देऊनत्यांनी इतर भारतीयांना शिक्षण दयावे ही भूमिका घेतली.त्यामुळे शिक्षण एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे झिरपत, पाझरत जाईल व संपूर्ण भारतीयांना शिक्षण मिळेलहीत्याची अपेक्षाहोती.याच पध्दतीला लॉर्ड मेकॉले याने शिक्षणाचा झिरपता सिध्दांत असे मानले आहे.याचा परिणाम असा झाला की ज्यांना शिक्षणाचे महत्त्व समजलेहोतेत्यांनी शिक्षण उत्तम पध्दतीने घेतले.याउलट ज्यांना वर्षानुवर्षे शिक्षणाची आवड नव्हती असा समाज शिक्षण व्यवस्थेतून मागे पडलेला आहे.स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत देण्याचे निश्चित केले.यासाठी प्राथमिक शाळांची उभारणी करण्यात आली.वेळोवेळी शिक्षण व शैक्षणिक प्रश्नाबाबत जे विविध आयोग नेमले गेलेत्यांनीही उपेक्षित वर्गाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी विविध शिफारशी व उपाययोजना सुचविल्या आहेत.

संशोधनासाठी निवडलेल्या घटकांचा अर्थ त्यामागील कारणे यांचा शोध घेण्याचा प्रयत्न होतो.समस्येबाबत माहिती गोळा करणे, त्याचे योग्य व्यवस्थापन करणे इत्यादी गोष्टींचा अभ्यास यात करणे अपेक्षित असते.यावरील संशोधनासाठी योग्य मार्गदर्शकांची आवश्यकता मार्गदर्शन घेऊन आत्मविश्वासपूर्वक संशोधन कार्य शेवटपर्यंत नेणे शक्य आहे.असा विश्वास आहे यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न या संशोधन कार्यातून मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे.

## संशोधनसमस्येची गरज :-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणी म्हणजे घरगुती परिस्थिती , आर्थिक परिस्थिती, शिक्षणाबाबत उदासिनता , सातत्यपणा नसणे पालकांमध्ये शिक्षणाबाबत कि जागरूकता आहे यामुळे मुलांच्या मनात शिक्षणाविषयी महत्व वाढविण्यासाठीसंशोधनाची गरज आहे. पूर्वीची वर्णनात्मक पद्धती विद्यार्थ्यांना कंटाळवाणी होती यात बदल घडवून चित्रांचा वापर करून शिक्षणाची आवड निर्माण करणे. परिस्थितीमुळे शिक्षण बुडू नये म्हणून कामाला जाणाऱ्या मुलांना काम करत करते शिक्षणही किती आवश्यक महत्वाचे आहे याचे ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहचविणे.

**संशोधनाचे महत्व :-**

1. सदरसंशोधनामुळे विद्यार्थ्यांना कोणकोणत्या अडचणी आहेत यांचे ज्ञान शिक्षकांना व पालकांनाहोणार आहे.
2. संशोधनामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात पुन्हा जास्त प्रमाणात सक्रिय करणे .
3. सदरसंशोधन माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अडचणींचा अभ्यास करून त्यांना पुन्हा शिक्षणाचे महत्व पटवून देणे.
4. यामुळे व्यवसायिक शिक्षण या विषयाला सुद्धा या संशोधनाचा उपयोगहोईल.
5. या संशोधनामुळे एकूण परिस्थितीचा अडचणींचा विचार करून नवीन अभ्यास पद्धती विकसित करण्यास चालना मिळेल.

**संशोधनाचे शिर्षक :-**

**" माध्यमिक स्तरावरील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास"**

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

1.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांबाबत शिक्षकांची मते जाणून घेणे.
2. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांबाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचासखोल अभ्यास करणे.
4.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करणे.

**शालेय सर्वेक्षण पद्धती :-**

याचा हेतू शिक्षक-विद्यार्थी यांच्याशी संबंधित आहे येणाऱ्या अडचणी कोणत्या त्या दूर करण्यासाठी उपाययोजना करणे व योग्य मार्ग शोधणे.संशोधकानेसंशोधन विषयाची निश्चिती केल्यानंतर त्याच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष विद्यार्थी जेथे आहेततेथे भेट देऊन अडचणी जाणून घेण्याचा व त्या सोडविण्याचा प्रयत्न आपल्याला या संशोधन कार्यात करता येईल.

**संशोधनाचीसाधने व तंत्रे निवड :-**शिक्षकांसाठी प्रश्नावली, विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली

**नमुना निवड :-**

1. ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांतील 5 शाळांची निवड करण्यात आली आहे.
2. शिक्षकांची निवड 5 शाळांमधील प्रत्येकी 2 शिक्षकांची निवड केली आहे.
3. विद्यार्थ्यांची निवड प्रत्येक शाळेतील 10 विद्यार्थी ह्या प्रमाणात एकूण 50विध्यार्थ्यांची निवड ह्यासाठी केली आहे.

**शिक्षक व विद्यार्थी प्रश्नावलीवरून संशोधनाचे निष्कर्ष :-**

१ मजूरांच्या वस्तीवर शैक्षणिक कामानिमित्त भेट देणाऱ्या शिक्षकांची संख्या ०८ टक्के आहे .तर वीटभट्टी मजूरांच्या वस्तीवर शैक्षणिक कामानिमित्त भेट न देणाऱ्या शिक्षकांची संख्या ९२ टक्के आहे

२ मजूरांच्या वस्तीवर शैक्षणिक कामानिमित्त भेट देऊन मजूरांना व्यवसायासंबंधी त्यांचेबरोबर हितगुज न करणाऱ्या शिक्षकांची संख्या ९२ टक्के आहे

३ ९२ टक्के शिक्षकांना शैक्षणिक सुविधा दिसून आल्या नाहीत.

४ पालक यांच्याबरोबर चर्चा करणाऱ्या शिक्षकांची संख्या ८ टक्के आहे . तर चर्चा न करणाऱ्या शिक्षकांची संख्या ९२ टक्के आहे .

५ शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक सभेत मुला-मुलींच्या समस्येबाबत चर्चा होत नाही असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ५२ टक्के आहे

६ वंचित घटकांच्या समस्याच्या बाबतीत सामाजिक लेखन न करणाऱ्या शिक्षकांची संख्या ९२ टक्के आहे .

७ एखादे उपयुक्त पुस्तक ग्रंथालयामध्ये नसेलतर पुस्तकाच्या पुर्ततेची मागणी मुख्याध्यापकाकडे ६४टक्के शिक्षक करतात. तर स्वतः पुस्तक विकत घेऊन ग्रंथालयात ठेवणारा एक शिक्षक आहेतसेच स्वतःची प्रत खरेदी करणारे ३२ टक्के शिक्षक आहेत.

८ मुला-मुलींचा शैक्षणिकसमस्येपैंकी अध्ययन साहित्य नाही म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ११ आहे , त्यांचे प्रमाण ४४ टक्के आहे. अध्ययनात लक्ष लागत नाही म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या ०२ आहे ,त्यांचे प्रमाण ८ टक्के आहे. तर विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी पुरेसा वेळ नसतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या १२ टक्के म्हणजेत्यांचे प्रमाण ४८ टक्के आहे.

९ त्यांना अध्यापन केलेले का समजत नाही याचे कारणतेशाळेत अधून मधून गैरहजर राहतात असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या २३ इतकी आहे. तर विद्यार्थ्यांत शिक्षणाची आवड नसते असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या ०२ आहे

१० विद्यार्थी शाळेत उशीरा येण्याची कारणे सांगताना, पालकांच्या व्यवसायात मदत करावी लागते असे कारण सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या २१ आहे.

११ विद्यार्थी शाळेमध्ये सतत गैरहजर राहतात असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या १७ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ६८ इतके आहे.

१४ विद्यार्थी सतत गैरहजर राहील्याने शैक्षणिक दृष्टया मागास राहतात असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या २५ आहे. त्याचे शेकडा प्रमाण १०० टक्के इतके आहे.

१५ मुलांच्या गैरहजेरीचे कारण आई वडीलांच्या व्यवसायात मदत करावी लागते आहे असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या २० आहेत्याचे शेकडा प्रमाण ८० इतके आहे.

१६ मुलीची शैक्षणिकसमस्यापैकी घरातील लहान भावडांना सांभाळणे ही समस्या सांगणाऱ्या शिक्षकांचे संख्या ०४ इतकी आहे. त्याचे शेकडा प्रमाण १६ इतके आहे आणि त्यांना घरकामात मदत करावी लागते असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या १३ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ५२ इतके आहे.

१७ मुला -मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी माता,पिता, पालक यांची मदतहोते असे मानणाऱ्या शिक्षकांची संख्या १८ असूनत्यांचे शेकडा प्रमाण ७२ इतके आहे.

१८ आपल्या वर्ग अध्यापनात विद्यार्थी सहभाग वाढावा म्हणून विविध शैक्षणिकसाहित्याचा वापर करणाऱ्या शिक्षकांची संख्या ०७ आहे. त्यांचे शेकडा प्रमाण २८ इतके आहे.

१९ दररोज शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४५ असूनत्याचे शेकडा प्रमाण ९० इतके आहेतसेच कधी कधी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ०५ असूनत्याचे शेकडा प्रमाण १० इतके आहे.

२० शाळेत ग्रंथालय सुसज्ज नाही असे म्हणणारे १८ विद्यार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ३८ इतके आहे.

२१ अभ्यासासाठी पुस्तके शिक्षकांकडून घेणारे विद्यार्थी १७ आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ५२ इतके आहे.

२२ स्वतंत्र प्रयोगशाळा नाही असे म्हणणारे ३० विद्यार्थी आहेतत्यांचे शेकडा प्रमाण ६० इतके आहे.

२३ विज्ञानाचे प्रयोग वर्गखोलीत दाखविले जातात असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३० इतकी आहेत्यांचे शेकडा प्रमाण ६० इतके आहे.

२४ प्रयोगासाठी लागणारे प्रयोगसाहित्य उपलब्ध आहे असेसांगणारे ५० विद्यार्थी आहेत, त्यांचे शेकडा प्रमाण १०० इतके आहे. तर स्वतंत्र प्रयोग शाळा, पाण्याचीसोय, योग्य फर्निचर, विजेची सोय असण्याचे शेकडा प्रमाण ०० आहे.

२५ प्रयोगसाहित्याची नावे माहित नसतात असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २८ असूनत्यांचे शेकडा प्रमाण ५६ इतके आहे, तर प्रयोगसाहित्य व्यवस्थीत हाताळता येत नाही, असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २२ असूनत्यांचे शेकडा प्रमाण ४४ इतके आहे.

२६ क्रिडांगणावर खेळ खेळतो असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १० आहेत्यांचे शेकडा प्रमाण ८० इतके आहे.

२७ शाळेमध्ये गेल्यावर वर्गखोलीत खेळ खेळतो असेसांगणारे ४० विद्यार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण २० इतके आहे.

२८ शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही याचे शेकडा प्रमाण ६४ इतके आहे. तर शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही असेसांगणारे विद्यार्थी १८ आहेतत्यांचे शेकडा प्रमाण ३६ इतके आहे.

२९ वडीलांचा व्यवसाय मजूर असणाऱ्या विद्यार्थ्याची संख्या ५० असूनत्यांचे शेकडा प्रमाण १०० इतके आहे.

३० पालकांच्या व्यवसायात मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४५ असूनत्यांचे शेकडा प्रमाण ९० इतके आहे, तसेच पालकांच्या व्यवसायात मदत न करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ०५ असूनत्यांचे शेकडा प्रमाण प्रश्नावली इतके आहे.

३१ पालकांना त्यांच्या व्यवसायात सुट्टीच्या दिवशी मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १३ असूनत्यांचे शेकडा प्रमाण २६ इतके आहे.

३२ पालकांना कामात मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४० इतकी आहेत्यांचे शेकडा प्रमाण ८० इतके आहे.

३३ आशय न समजल्यामुळे टिपणे काढता न येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १७ आहे.

३४ इंग्रजीमध्ये वाक्यरचना करता येत नाही असेसांगणारे ११ विद्यार्थी आहेतत्याचे शेकडा प्रमाण २२ आहे. तसेच इंग्रजीमध्ये पत्र व नोकरीचा अर्ज लिहता येत नाही असेसांगणारे १६ विद्यार्थी आहेतत्याचे शेकडा प्रमाण ३२ आहे.

## शिफारशी :-

**१.** सर्वच शाळेतील ग्रंथालय असणे आवश्यक आहे. शाळांनी विद्यार्थ्यांना शासनाने पुरविलेली पुस्तके अभ्यासासाठी द्यावीत कारण ग्रामीण भागातील विद्यार्थी हे आर्थिकदृष्टया मागास असतात.

२. जास्तीत जास्त प्रयोगहे प्रयोगशाळेत व्हावेत व प्रयोगशाळेतील संबंधित साहित्य कसे हाताळावे याची माहिती त्यांना दयावी.

३.पालकांची सभा घेऊन त्यांना शिक्षणाविषयी महत्त्व पटवून द्यावे की, जेणेकरून त्यांचा पाल्य शाळेत वेळेवर उपस्थित राहेल.
४. मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी महिला मेळावे, शिबीरे, आयोजन करून शासकीय, निमशासकीय सेवेतील स्त्री कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊनस्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दयावे.
५. शिक्षकांनी पालकांच्या वैयक्तीक भेटी घेऊन पाल्यांना कराव्या लागणाऱ्या कामाच्या वेळाचे नियोजन करावे.
६. इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना शिक्षकांनी आशय इंग्रजी भाषेतूनच शिकवावा त्यामुळे विद्यार्थ्यांवर मातृभाषेच्या परिणामहोणार नाही व इंग्रजी अध्ययनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांनी ज्यादातासाचे आयोजन करावे.
७. मराठी व हिंदी या विषयाचा आशय समजण्यासाठी संबंधित शिक्षकांनी वेगवेगळया अध्ययन -अध्यापन पद्धतीचा वापर करून अध्ययनाची रूची वाढवावी
८. मुलांना शाळेबद्दल उत्सुकता रहावी यासाठी शाळेत अभ्यासेत्तर उपक्रमही राबवावेत.
९. शिक्षकांनी स्वतःची प्रत खरेदी केलीतरती खूप चांगली बाब होईल.
१० मुलांना अध्ययन साहित्य उपलब्ध करून द्यावे व त्यांना अध्ययनासाठी पुरेसा वेळ द्यावा.
११ त्यांच्यात शिक्षणाची आवड वाढवण्यासाठी शिक्षकांनी व पालकांनी प्रयत्न केले पाहिजेत
१२ विद्यार्थ्यांना व पालकांनासमुपदेशन करावे.
१३ काही मुलींना शिक्षणाबद्दल भिती निर्माण झालेली असतेती शिक्षकांनी दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे
१४ विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचेसलोख्याचे संबंध असणे व शिक्षकांनीस्नेहाचे वातावरण तयार करणे आवश्यक आहे.
१५ सर्वच शाळांमध्ये स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळाअसावे.
१६ सर्वच शिक्षकांनी प्रभावी अध्यापन करून त्यांच्या या अध्ययनातील समस्या दूर करणे गरजेचे आहे.
१७ भूगोलातील प्रश्न सोडविताना विद्यार्थ्यांना वेगवेगळया प्रकारची अडचणी येतात. त्या कमी करण्यासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशिल राहणे गरजेचे आहे.
१८ विद्यार्थ्यांच्या अडचणी दूरहोण्यासाठी, लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इ. उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

## संदर्भग्रंथ सूची

१. जीवन शिक्षण , (जून २००६), पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिकसंशोधन व प्रशिक्षण परिषद.
२. जीवन शिक्षण , (ऑगस्ट २००८), पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिकसंशोधन व प्रशिक्षण परिषद.
३. बापट भा.गो.(१९९५),शैक्षणिकसंशोधन, सुधारीत आवृत्ती,पुणेःनूतन प्रकाशन.
४. भोसले, इनामदार, संकपाळ,(२००५), सर्व शिक्षण मोहीमसमृद्धीची दिशा ,कोल्हापूर : समृद्धी प्रकाशन.